# भा.कृ.अनु.प.–केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी १३ ते १९ जून २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| | जून मधील पाऊस (मि.मी मध्ये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | सल्ला |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| नागपूर | ० | ० | ० | १ | १ | २ | ३ | |
| वर्धा | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | |
| चंद्रपूर | १ | ० | २ | १ | १ | ३ | ४ | |
| यवतमाळ | ० | ० | ० | ० | ० | २ | ५ | |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अकोला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| बुलढाणा | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | |
| परभणी | ० | ० | ० | ० | ० | ० | १०२ | |
| नांदेड | ० | ० | ० | ३ | ० | ९ | १०७ | |
| बीड | २ | ६ | ० | ० | ० | ० | ७५ | |
| वाशिम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| धुळे | ० | २ | ० | ० | ० | ० | ५ | |
| जळगांव | ० | ० | ० | ० | ० | ० | ११ | |
| जालना | ० | ० | ० | ० | ० | ० | २७ | |
| औरंगाबाद | ० | ० | ० | ० | ० | ० | २४ | |

महाराष्ट्रामध्ये चांगल्या पावसाची शक्यता १९–२० जून ते ४ जुलै पर्यंत वर्तविण्यात येत आहे. अगोदर सांगितल्याप्रमाणे जुलै महिन्यात १५ दिवसाचा कोरडा काळ राहणार आहे. पेरणीसाठी १४ ते २५ जून हा अगदी योग्य वेळ आहे पाण्याची साठवण करण्याचे उपाय करणे कोरडवाहू क्षेत्रासाठी गरजेचे आहे. पेरणीसाठी जूनचा शेवटचा आठवडा ते जुलै महिन्याचा पहिला आठवडा अगदी योग्य वेळ आहे.

- **कापसाची २०१६ मधील लोकप्रिय वाण/संकरीत वाण :**
  कमी ते मध्यम कालावधीचे वाण जसे सुरज, एनएच–६१५, एकेएच–०८१ किंवा देशी वाण फुले धन्वतंतरी, रोजा (कें.का.सं.संस्था), एकेए–०७ या वाणांची निवड कोरडवाहू क्षेत्रात दाट पेरणीसाठी (४५ X १० सेंमी) किंवा (६० X १० सेंमी) अंतरावर वाणानुसार त्याची जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पेरणी करावी. पावसाच्या सध्याच्या अंदाजानुसार बीटी संकरीत वाण जे तुडतुडयास रोगप्रतिकाकर असतील अशा प्रकारची अंकुर जयबीटी, अंकुर ३०३४, अंकुर ३०२८, एमआरसी ७३४८, अजीत–११, अजीत–१११, अजीत–१५५, राशी–७७९, राशी–६२५, राशी–६५६, मल्लिका, बन्नी, भक्ती, सोना, बलवान, सुरक्षा, जाडो, केसीएच ७११, केसीएच १४४ अशा वाणांचा वापर करावा. याठिकाणी दिलेली यादी ही फक्त निर्देशासाठी आहे त्यामध्ये भा.कृ.अनु.प.–कें.का.सं.सस्थेचा यामध्ये कोणताही असा उद्देश त्यांची मागणी वाढवणे हा नाही अशा प्रकारची भरपूर वाण जे कमी कालावधीत वाढतात आणि तुडतुडयास रोगप्रतिकारक असतात बाजारात उपलब्ध आहेत. वरील दिलेले वाण शेतकऱ्यांच्या अनुभवातून व बाजारात बियाण्यांची असलेली उपलब्धता यावरून

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | त्यांची यादी बनवली आहे. लांब कालावधीचे बीटी वाण महाराष्ट्रामध्ये घेणे टाळावे. कारण असे वाण नोव्हेंबर–डिसेंबर मध्ये गुलाबी बोंडअळीस बळी पडते. वरील नमुद केलेले वाण किंवा संकरीत वाण जास्त कालावधीचे होऊ शकते जर आपण ३०–५० दिवसामध्ये झाडाला जास्त प्रमाणात युरिया दिला तर किंवा मोनोक्रोटोफॉस, ॲसिफेट, इमिडक्लोप्रिड, थायोमिथेक्सान ची फवारणी केल्यास कारण ती किटकनाशके पिकांचा कालावधी वाढवतात.<br>• **कापसासाठी जमिनीची मशागत करताना घेण्याची खबरदारी आणि उपाय :**<br>पिकांची चांगली वाढ होण्यासाठी पेरणीपूर्वी जमिनीची मशागत करणे गरजेचे आहे. जर जमिनीची मशागत योग्यप्रकारे झाली नाही तर उगवणक्षमता कमी होते पिकाची असमान वाढ होते आणि तणांचे प्रमाण वाढते जेव्हा पिक वाढीच्या अवस्थेत असते. त्यामुळे जमिनीची चांगली मशागत करणे हे चांगल्या शेतीचे एक तत्व आहे. कापूस लागवडीमध्ये पावसाच्या अगोदर जमिनीची मशागत करणे गरजेचे आहे त्यामध्ये प्रक्रियेमधून जावे लागते.<br>**कोरडवाहू आणि ओलीताखालील कापूस :**<br>१. मगील वर्षाचे काडी–कचरा, वाया गेलेले कापसाचे तुकडे माणसामार्फत वेचून घ्यावे कारणे त्यामध्ये किडी व रोगास कारणीभूत असणारे घटक असतात. त्यामुळे स्वच्छ मशागत करणे पिकाच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे.<br>२. ३ वर्षातून एकदा जमिनीची खोल नांगरट करणे गरजेचे आहे.<br>३. जेव्हा जमिन कोरडी असते तेव्हा जमिनीची बखरणी खोल (१२–१५ सेंमी खोल) करणे गरजेचे आहे. त्यामुळे जमिनीमध्ये विविध स्तर निर्माण होतील व पाणी आणि अन्नद्रव्यांचा नाश होणार नाही. वरवरची वखरणी आणि खोल वखरणी दोन्हीही कापसाच्या लागवडीसाठी पोषक नाहीत. वखरणी केल्याने माती मोकळी होते.<br>४. चांगले कुजलेले खत प्रति २–३ टन/हेक्टर किंवा गांडूळखत २.५ टन प्रति हेक्टर ३–४ वर्षातून एकदा १०–१५ दिवसापूर्वी टाकून घ्यावे त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढेल.<br>५. त्यानंतर मोल्ड बोर्ड नांगरणे नांगरणी करावी (२०–२५ सेंमी) खोल त्यामुळे कुजलेले खत किंवा गांडूळखत जमिनीत गाडले |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | जाईन. तयानंतर जमिनीवरील ५ सेंमी पेक्षा जास्त मोठी ढेकळे फोडून काढावी.<br>६. ओलीताखालील क्षेत्रासाठी कुजलेले खत प्रत्येक वर्षी प्रति २—३ टन प्रमाणे देण्यात यावे.<br>७. ओलीताखालील क्षेत्रासाठी रूंद अशा सऱ्या उतारानुसार तयार कराव्या आणि त्यामध्ये ३—५ सेंमी इतक्या खोलीवर पेरणी करावी. पेरणीनंतर ३० दिवसानी पिकास माती लावून घ्यावी किंवा सऱ्या व्यवस्थीत करून घ्यावेत.<br>८. पहिल्या पावसानंतर वापरायची तणनाशक पेन्डीमिथेलिन प्रति ३.५ लि/हे (१ किलो प्रति हे) घेवून जमिनीवरती फवारणी करावी.<br>९. ब्लेड असलेल्या वखराने २—३ वेळा वखरणी करावयी त्यामुळे माती मोकळी होईल.<br>१०. जमिनीमध्य ट्रॅक्टर रोटावेटर वापरावा त्यामुळे जमिन (१५—२० सेंमी) भुसभुसीत होईल.<br>११. जमिनीमध्ये पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी जमिनीची पातळी एकसमान होण गरजेचे आहे त्यासाठी लाकडी वखर वापरावा.<br>१२. मध्यम आणि उथळ जमिनीसाठी १५ सेंमी खोल आणि १५०—१८० सेंमी लांब आणि ३० सेंमी रूंद असा अरूंद असा वरंभा तयार करावा. खोल जमिनीसाठी अरूंद सरी ट्रॅक्टर किंवा नांगराचा वापर करून तयार करावी.<br>१३. टिफ्फनचे अंतर वाणांच्या गरजेनुसार करून घ्यावे.<br>१४. सुरूवातीला देण्यात येणारी खताची नत्र आणि स्फुरद ची मात्रा मध्यम स्वरूपाची देण्यात यावी. एक नीमयुक्त युरियाची पिशवी (५० किलो) + सिंगल सुपर फॉस्फेट (३०० किलो) ची पिशवी एकत्र करून पेरणीच्या वेळेस देण्यात यावी.<br>१५. कापसाच्या बियाण्यास ॲझेटोबॅक्टर प्रति २५ ग्रॅम/किलो बियाणे, फॉस्फरस सोल्यूबलाईझम बॅक्टेरिया (पी.एस.बी) प्रति २५ ग्रॅम आणि ट्रायकोड्रामा विरीडी प्रति ८ ग्रॅम/किलो या प्रमाणे घेवून बियाण्यास बीजप्रक्रिया करावी व नंतर बीज १५—३० मिनीट सावलीत कोरडे होण्यासाठी ठेवावे ही बियाणे २४ तासात पेरणीसाठी वापरावे.<br>१६. कापसाची लागण टोकणपध्दतीने ५ सेंमी इतक्या खोलीवर कोरडया जमिनीत करावी तसेच पेरणीपध्दतीने करावी जेव्हा ७०—८० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मिमी पाऊस पडला असेन कारण त्यामुळे बियाण्यांची उगवणक्षमता वाढेल आणि पिकांची वाढ एकसमान होईल.<br>१७. उगवणीनंतर ४—६ दिवसांनी पिकामध्ये आंतरमशागत दोन पिकामधील अंतरामध्ये करून घ्यावी जोपर्यंत पिक एक महिन्याचे होत नाही.<br>**अगोदर घेण्याचे उपाय :** यावर्षी जुलै महिन्याच्या मध्यात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे पाणी साचून राहू शकते. जुलै महिहन्याच्या पहिल्या पंधरवड कोरडा असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे तसेच लवकर पाऊस संपणार असल्यामुळे बोंडावस्थेत पिकाला पाण्याचा ताण पडण्याची शक्यता आहे. काळया जमिनीत अशा प्रकारे अडथळे येऊ शकतात. वरील समस्येवर मात करण्यासाठी जमिनीची तयार करताना पुढील खबरदारी घ्यावी.<br>**<u>जमिनीमध्ये खोल आणि रूंद चिटा आणि कठोर जमिन</u> :—** ही समस्या सोडवण्यासाठी जमिनीमध्ये मोठया प्रमाणात कुजलेले खत घालावे आणि जमिनीची योग्य प्रकारे मशगत करून घ्यावी त्यामुळे जमिनीमध्ये अधिक ओलावा टिकून राहील.<br>**<u>जमिनीमध्ये कॅल्सीयम कार्बोनटचे प्रमाण वाढले</u> :—** त्यासाठी जमिनसुधारक म्हणून टॅन्क सिल्ट, मळी, राख आणि जिप्समचा वापर करावा. जमिनीमध्ये क्षारयुक्त पिके जसे कापूस + गाठिवर्गीय पीके आणि पिकाला फेरपलटी पीक (भुईमुंग) ही घ्यावीत.<br>**<u>जमिन अधिक कडक होण</u> :—** जमिनीची मशागत बैलाकडून वखरामार्फत किंवा नांगराद्वारा करावी. चाईझल नांगरणे जमिनीची ५० सेंमी इतकी खोल नांगरट करावी.<br>**<u>जमिनीमध्ये निचरा न झाल्यामुळे पाणी साचून राहणे</u> :—** जमिनीची मशागत खोल चाईझल (५० सेंमी) आणि मऊ (०.६:) करून घ्यावी. कापसाची पेरणी अरूंद अशा सऱ्यावरती आणि कायमच्या अरूंद वरंभ्यावर करावी त्यामुळे जमिनीचा योग्य निचरा होईल.<br>**<u>जास्त वेळ कोरडा काळ आणि दुष्काळ</u> :—** त्यासाठी पिकाच्या वाढीच्या वेळेस मुळयाभोवती नैसर्गिक खत देण्यात यावी. बोरू किंवा धैंचा चे ४०—४५ दिवसाने आच्छादन करावे त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होणार नाही तसेच पिकाला गरज असेल तेव्हा संरक्षित पाण्याची पाळी देण्यात यावी (बोंडावस्थेत आणि बोंडाच्या वाढीच्या अवस्थेत) |

| आख्यायिक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मि.मी. मध्ये) | < ५ | ५-२० | २०-५० | ५०-८० | >८० |
| | | | | | |

संदर्भ:— http://nwp.imd.gov.in/bias/dist_fcst.htm
http://www.accuweather.com/en/in/india-weather